# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ३ रे | अंक १२१ वा | शनिवार दि.३० सप्टेंबर २०२३ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.







## ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण!

मुंबई : इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे. इतर मागास समाजाचे महामंडळ, सारथी, बार्टी, महाज्योती, टीआरटीआय या संस्थांना निधी वाटपात सुसुत्रता आणतानाच सर्व समाज घटकांना समप्रमाणात न्याय देण्यात येईल, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बारा बलुतेदारांना लाभ मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.



सह्याद्री अतिथीगृह येथे इतर मागास वर्ग तसेच भटके-विमुक्त समाजातील विविध संघटनांची मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार रामदास तडस, आमदार सर्वश्री डॉ. संजय कुटे, परिणय फुके, गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

सुमारे तीन तास चाललेल्या बैठकीत इतर मागासवर्ग, भटके-विमुक्त, बारा बलुतेदार आदी समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडले. कुठल्याही समाजाचे आरक्षण कमी करण्याची शासनाची भूमिका नाही, असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, मराठा समाजाचे रद्द झालेले आरक्षण पुन्हा मिळवून देताना इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. जुन्या कुणबी नोंदी असलेल्यांना कुणबी दाखले देण्यासंदर्भात निवृत्त न्यायमुर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यवाही सुरू आहे. राज्य शासन इतर मागास, भटक्या विमुक्त समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.

## किल्लारी ३० खेडी योजनेची आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडून वचनपूर्ती.....

औसा - गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेली किल्लारी ३० खेडी पाणीपुरवठा योजना अखेर आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने पुनर्जीवित झाली असून किल्लारीसह ३० गावांना या योजनेतून पाणीपुरवठा होणार असून गुरुवार (दि.२८) सप्टेंबर रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी या योजनेचे बटण दाबून प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू केला आहे. किल्लारी ३० खेडी योजना सुरू करण्याचा दिलेला शब्द त्यांनी पाळत या योजनेतील पाण्याचा निळकंठेश्वर ला जलअभिषेक करीत आपली वचनपूर्ती पुर्ण केली.

१९९३ च्या भूकंपानंतर अ वर्गवारीतील किल्लारीसह ३० भूकंपग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी किल्लारी व ३० खेडी पाणीपुरवठा योजना सुरु करण्यात आली होती पण ती पुढे कालांतराने बंद पडली. ही योजना पुन्हा सुरू करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी किल्लारीकरांना शब्द दिला होता.यासाठी त्यांनी शर्तीचे प्रयत्न करीत देवेंद्र फडणवीस यांच्याकडून हि योजना पुनर्जीवित करण्यासाठी २८ कोटींचा निधी मंजूर करून घेतला. या निधीतून दुरुस्तीचे कामे तसेच थकीत वीजबिलाचा भरणा ही करण्यात आला परंतु वीजबिल भरणा केल्यानंतरही व्याज थकीत असल्याने किल्लारी व ३० खेडी पाणीपुरवठा योजना सुरू होवू शकली नव्हती. दरम्यान यासाठी आमदार पवार यांनी सदरील वीजबिलावरील व्याज व दंड माफ करणे आणि नवीन वीजजोडणी देण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विनंती केली होती.या विनंतीवरून वीज बीलावरील थकीत तब्बल ६.५० कोटी रु. व्याजही माफ करण्यात आले. आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने किल्लारीसह ३० खेड्यांमधील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण अशी हि योजना गुरुवारी प्रत्यक्षात सुरु झाली. सदरील योजना २०१७ पासून कायमस्वरूपी बंद झाली होती.सदरील योजनेतील बहुतांश गावात दुसरी कुठलीच कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नसल्याने या गावातील नागरिकांना पाणीटंचाई चे चटके सहन करावे लागत होते. दरम्यान हि योजना पुनर्जीवित व्हावी अशी मागणी सदरील योजनेतील गावातील लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडे केली होती. हि योजना पुनर्जीवित करण्याचा शब्द आ. अभिमन्यू पवार यांनी नागरिकांना दिला होता तो अखेर तो प्रत्यक्षात खरा करून दाखवत दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती त्या अनुषंगाने त्यांनी करून दाखवली. त्यामुळे या योजनेतील लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



यावेळी गुंडाप्पा बिराजदार, निवृत्ती भोसले, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे, शहराध्यक्ष सुनील उटगे, काकासाहेब मोरे, सभापती चंद्रशेखर सोनवणे,तहसीलदार भरत सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता राजेश पाटील, प्रकाश पाटील, बंकट पाटील, गोविंद भोसले, युवराज बिराजदार, प्रा सुधीर पोतदार, अभियंता बाळासाहेब शेलार, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, सरपंच आश्विनी घाडगे,दिपक चाबुकस्वार, संजय कुलकर्णी, प्रवीण कोपरकर, विकास नरहरे, सचिन आनसरवाडे, युवराज गायकवाड, रमेश हेळंबे, हरूण अत्तर, कमलाकर बाबळसुरे, विजय भोसले, दिलीप भोसले, बाबुराव बिराजदार, केशर लाळे, रोहिदास हजारे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी ३० खेडी योजना अंतर्गत गावातील सरपंच /उपसरपंच यांच्या वतीने आ. अभिमन्यू पवार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**योजना सुरळीतपणे चालण्यासाठी पाणीपट्टी भरणे आवश्यक - आ अभिमन्यू पवार**

१९९४ मध्ये युती सरकारने किल्लारी ३० खेडी पाणीपुरवठा योजनेला मंजुरी दिली. पुढे योजनेचे पुनर्जीवनही युती सरकारनेच केले.२०१० ते २०१७ पाणीपट्टी वसुली व वीजबिल थकबाकी पोटी तसेच काही तांत्रिक अडचणींमुळे अनेक गावांना पाणीपुरवठा होत नसल्याने या योजनेला घरघर लागली व नंतर हि योजना बंद पडली. यानंतर किल्लारी ३० खेडी पाणीपुरवठा योजना पुनर्जीवित करण्यासाठी भगीरथ प्रयत्न करण्यात आले आहेत. हि योजना कार्यान्वित करण्यासाठी १०० कोटींचा तरतूद करण्यात आली असून यापुढे हि योजना सुरळीतपणे चालावी असे वाटत असेल तर पाणीपट्टी भरणे आवश्यक आहे. त्याशिवाय हि योजना चालू शकणार नाही.त्यामुळे नियमित पाणीपट्टी भरावे असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी बोलताना केले.

## शौर्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर (जिमाका) : भारतीय सैन्याने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी २९ सप्टेंबर हा दिवस शौर्यदिन म्हणून साजरा होतो. हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात शौर्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे, ले. कर्नल (नि.) बी. आर. हरणे, मेजर (नि) व्ही. व्ही. पटवारी यांच्यासह माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी आणि शौर्यपदक प्राप्त सैनिकांचा सन्मान करण्यात आला. तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, अर्थसहाय्यचे धनादेश वितरीत करण्यात आले. प्रारंभी दीपप्रज्वलन आणि शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपले सर्वस्व पणाला लावून देशाच्या सीमेवर कर्तव्य बजाविणाऱ्या सैनिकांमुळे आपण सर्वजण सुरक्षितपणे जीवन जगत आहोत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या सैनिकांचा, त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाचा आदर केला पाहिजे. आजी-माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव कटीबद्ध असून दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्येक तहसील कार्यालयात आजी-माजी सैनिकांच्या समस्या ऐकून घेण्यात येत असून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच शौर्यदिन हा राष्ट्रप्रेमाची भावना जाज्वल्य करणारा दिवस असून यानिमित्ताने प्रत्येकाने आपल्या समाजासाठी, देशाच्या विकासासाठी योगदान देण्याचा निश्चय करावा, असे आवाहना त्यांनी यावेळी केले.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी प्रास्ताविकामध्ये शौर्यदिन आयोजनाची पार्श्वभूमी विषद केली. तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत माजी सैनिक पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अर्थसहाय्य याबाबत माहिती दिली. दिपाली हरणे व त्यांच्या चमूने यावेळी विविध देशभक्तीपर गीते सादर केली.

## आयुष्मान भव: कार्यक्रम आज १३ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबीर

लातूर/प्रतिनिधी :- प्रधानमंत्री यांच्या सूचनेनुसार आयुष्मान भव: हि महत्वाकांक्षी मोहीम दि १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत राबविणे बाबत केंद्रशासनाने मार्गदर्शक सूचना कळविल्या आहेत. सदर मोहिमेचा उद्देश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत गुणवत्तापूर्वक आरोग्य सेवा , सुविधा पुरविणे व जनजागृती करणे हा आहे .या मोहिमेंत विविध आरोग्य विषयक योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे . आयुष्मान भव: कार्यक्रम अंतर्गत ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत दर शनिवारी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे बाबत सूचना आहेत व प्रत्येक शनिवारी तपासणीसाठी विविध आजार देखील निश्चित करून देण्यात आलेले आहेत .उद्या दि ३०/९/२०२३ रोजीच्या शिबिरात टीबी,कुष्ठरोग इ.संसर्गजन्य आजाराच्या रुग्णाची तपासणी करण्यात येणार आहे.तसेच सदरील शिबिराच्या ठिकाणी पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड , आभा हेल्थ कार्ड काढून देण्यात येणार आहे .तसेच मोफत रक्ततपासणी , रक्तदाब(इझ) ,मधुमेह (डींसरी) तपासणी केली जाणार आहे .

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत उद्या शहरात विविध १३ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. १) मनपा शाळा क्र.२८,सूळ नगर २)सुशीलादेवी कॉलेज ,खाडगाव रोड ३)कादरी उर्दू स्कूल पठाण नगर ४) प्रा,ना.आ.केंद्र ,मनपा शाळा क्र.९,मंठाळे नगर ५)इंदिरा नगर बौध्द विहार ,इंदिरा नगर ६) अण्णाभाऊ साठे शाळा , महाराणा प्रताप नगर ७) प्रा,ना.आ.केंद्र ,शिवशंकर मंदिर ,बादाडे नगर ८) प्रा,ना.आ.केंद्र ,यशवंत शाळा ,साळे गल्ली ९) आपला दवाखाना ,काळे गाली १०)आरोग्यवर्धिनी केंद्र ,ठाकरे चौक ११) आरोग्यवर्धिनी केंद्र ,वैशाली बौध्द विहार , बौध्द नगर १२) आरोग्यवर्धिनी केंद्र , मनपा शाळा क्र.५,आनंद नगर १३) आरोग्यवर्धिनी केंद्र , मोहल्ला क्लिनिक ,खोरी गल्ली तरी परिसरातील नागरिकांनी या आरोग्या शिबिरामध्ये आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी तसेच आपले आभा हेल्थ कार्ड काढून घ्यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे .

## मानवतेची शिकवण सर्वत्र प्रेरणादायी व्हावी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर दि. २९. :- तथागत भगवान बुद्धांची शिकवण मानवतेची आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी बुद्धाने मध्यम मार्गाचे प्रशिक्षण दिले आहे. शील, सदाचार, नीतिमत्ता, करुणा, शांती, प्रेम, मैत्री, बंधुभाव आणि मानवी मूल्यांचे बिजारोपण तथागत बुद्धाने जनमानसात केले त्यामुळे वर्तमान काळात बुद्ध उपदेशित शांती, करुणा, बंधुभाव आणि मानवतेची शिकवण सर्वत्र प्रेरणादायी व्हावी असे प्रतिपादन लातूरच्या नूतन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, रामेगाव ता.जि.लातूर द्वारा महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड येथे भाद्रपद पौर्णिमेच्या निमित्ताने धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी पवित्र बोधिवर्षाची पूजा करून बुद्ध स्तुपाची धम्म मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर त्रिसरण पंचशील, बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी समाज कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड (पुणे ), वसंत कोराला (श्रीलंका), सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. पी. सानप, सरपंच साधना मगर, तलाठी ज्योती गाढवे, कीटकशास्त्र तज्ञ डॉ. आनंद नरंगलकर (मुंबई) आदीची उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या की, महिला सक्षमीकरण ही काळाची गरज असून येणाऱ्या काळात सर्व क्षेत्रात महिला प्रगती करत असल्याचे स्पष्ट करीत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी म्हणून कटिबद्ध असल्याचे सांगून आज मोठ्या संख्येने महिला उपस्थित आहेत त्याबद्दल त्यांनी महिलांचे कौतुक केले.



यावेळी माजी समाज कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड यांनी उपस्थित तरुणांना विदेशात नोकरी व व्यवसाय करण्याकरिता यथोचित मार्गदर्शन केले. तसेच वसंत कोराला (श्रीलंका) यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, महाविहार धम्म संस्कार केंद्राच्या माध्यमातून येणाऱ्या काळात लातूर जिल्ह्यात बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला जाणार असल्याचे अभिवचन दिले. याच कार्यक्रमात खासदार सुधाकर शृंगारे यांनी पाठविलेला संदेश भिक्खू पय्यानंद थेरो यांनी सर्वांना वाचून दाखविला आणि त्यांच्या विशेष प्रयत्नातून पर्यटन विकास अंतर्गत ५० लक्ष रुपये प्राप्त झाले असून या विकास कामाचे भूमिपूजन माजी समाज कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. पि. सानप, सरपंच साधना मगर, जेष्ठ नागरिक विमलबाई सूर्यवंशी, सेवानिवृत्त कृषी अधिकारी भीमराव रणदिवे, ॲड. रमेश विवेकी, माजी सैनिक व बौद्ध उपासक वसंता कोरला (श्रीलंका), राजेंद्र कुमार निकाळजे, अंगद भोसले, नागसेन कामेगावकर, तलाठी ज्योती गाढवे आदीचा सत्कारही करण्यात आला. याप्रसंगी स्मृतीशेष मीनाताई कांबळे यांना उपस्थितांच्यावतीने सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले तर आभार डॉ. दुष्यंत कटारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पांडुरंग अंबुलगेकर, उदय सोनवणे, मिलिंद धावारे, अनिरुद्ध बनसोडे, प्राचार्य डॉ. संजय गवई, परमेश्वर आदमाने, सतीश मस्के, समाधान आचार्य, पंडित सूर्यवंशी, अंतेश्वर थोटे, विमल गायकवाड, शशिकला सुरवसे, आशा उडानसिंग, विद्या आल्टे, विद्या सुरवसे, शकुंतला नेत्रगांवकर, पंचशीला बनसोडे, निर्मला गौरकार आणि बालाजी धायगुडे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी लातूर जिल्ह्यातील बौद्ध उपासक-उपासिका

## संपादकीय....

### ताशेऱ्यांची (तकलादू) तडतड!

सर्वोच्च न्यायालय जिची अपेक्षा करते ती सदसद्विवेकबुद्धी राज्य सरकारकडे शाबूत असती तर शिक्षिकेने करवलेल्या मारहाणप्रकरणी सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घ्यावी लागली नसती.. ..कोणत्याही देशाच्या वर्तमानात एक वास्तव असे उभे ठाकते की तेव्हा सदसद्विवेकवाद्यांनी काय असायला हवे याबाबत केवळ भाष्य न करता ते तसे असेल याची हमी आपल्या अधिकारांच्या अंमलबजावणीतून देण्याची गरज असते. आपल्याकडे ही वेळ आली आहे किंवा काय हे समजून घेण्यास सर्वोच्च न्यायालय सक्षम आणि समर्थ आहेच.. उत्तर प्रदेशातील शाळेत एका शिक्षिकेने वर्गातील मुसलमान विद्यार्थ्यांस इतर विद्यार्थ्यांकरवी मारलेल्या थपडांचे वळ त्या विद्यार्थ्यांपेक्षा आपल्या गुरू-शिष्य परंपरा, 'भेदाभेद अमंगळ'ची शिकवण आणि कायद्यासमोर सर्व समान असल्याची बतावणी यावर अधिक पडलेले आहेत. या पार्श्वभूमीवर ''या घटनेने उत्तर प्रदेश सरकारच्या सदसद्विवेकबुद्धीस खडबडून धक्का बसायला हवा'', ही सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली अपेक्षा न्यायाधीशांस अपेक्षित असलेले आणि प्रत्यक्षात असलेले जग यातील तफावत दर्शवते. उत्तर प्रदेशमध्ये घडलेल्या त्या हीन घटनेतील संबंधितांवर कारवाई व्हावी यासाठी महात्मा गांधी यांचे नातू तुषार गांधी यांस सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागली. म्हणजे इतक्या मूलभूत आणि माणुसकीविषयक मुद्दय़ासाठीदेखील सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतात हे यातून दिसून येते. वास्तविक यातील प्रतिवादी उत्तर प्रदेश सरकारने गांधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दय़ांवर आपली भूमिका मांडणे शहाणपणाचे ठरले असते. पण या अशा साध्या शहाणपणाची अपेक्षा करणे हाच खरे तर मुळात अलीकडे वेडेपणा ठरावा अशी परिस्थिती. त्यानुसार उत्तर प्रदेश सरकारने तुषार गांधी यांच्या महात्मा गांधी यांचा नातू असल्याच्या आणि ते कारण पुढे करत याचिका करण्याच्या कृतीलाच आक्षेप घेतला. त्यावरही सर्वोच्च न्यायालयास राज्य सरकारला खडसावावे लागले. म्हणजे उत्तर प्रदेश सरकारचा प्रयत्न होता आरोप काय आहेत यापेक्षा ते कोणी केले आहेत याकडे लक्ष वेधून त्यांस कमी लेखण्याचा. सर्वोच्च न्यायालयाच्या जागरूकतेने तो हाणून पाडला गेला. तसे करताना सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारच्या सदसद्विवेकाविषयी वरील भाष्य केले. ते मात्र अस्थानी ठरते. कारण सर्वोच्च न्यायालय जिची अपेक्षा करते ती सदसद्विवेकबुद्धी राज्य सरकारच्या ठायी शाबूत असती तर या प्रकरणी कोणालाही सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घ्यावी लागली नसती. हा काही घटनेतील एखाद्या बहुचर्चित अनुच्छेदाचा अर्थ लावण्याचा वा काही गहन वैधानिक प्रश्न सोडवण्याचा मुद्दा नाही. किमान विवेक शाबूत असलेल्या कोणाही सज्ञानास जे झाले ते कसे हाताळायला हवे हे कळेल, इतके ते साधे आहे. आपल्या राज्यामधील एखाद्या खा-सगी शाळेतील शिक्षिका वर्गातील कोणा विद्यार्थ्यांस थपडा मारा असा आदेश इतर विद्यार्थ्यांना देते ही घटना उघडकीस आल्या आल्या खरे तर या शिक्षिकेस हाकलून देऊन पोलीस ठाण्यात तिची खणा-नारळाने ओटी भरली जाईल अशी व्यवस्था शासनाने करणे अपेक्षित. ही किमान अपेक्षा सर्वोच्च न्यायालयास अपेक्षित सदसद्विवेकबुद्धी शाबूत व्यवस्थेतच पूर्णत्वास जाऊ शकते. तेव्हा या प्रकरणी न्यायालयाने व्यक्त केलेला आशावाद हाच मुळात अवास्तव आणि अशक्यप्राय ठरतो. यात दुसरा भाग असा की आपण असे काही केल्यास शासन आपले बखोट धरेल ही भीती असती तर मुदलात सदर शिक्षिकेने इतके घृणास्पद कृत्य केलेच नसते. त्यानंतरही आपण जे केले त्यात काही गैर आहे असे या शिक्षिकेस वाटले नाही. त्यातून तिचे निर्ढावलेपण तितके दिसते. हे निर्ढावलेपण आले कोठून या प्रश्नाचा विचार न्यायाधीश महोदयांनी केला असता तर राज्य सरकारच्या सदसद्विवेकबुद्धीविषयी इतका आशावाद ते व्यक्त करते ना. त्यातून न्यायव्यवस्थेचा भाबडेपणा तितका दिसतो.या प्रकरणाच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्दे फारच महत्त्वाचे ठरतात. उदाहरणार्थ सदर विद्यार्थ्यांस दिलेल्या शासनामुळे त्याच्या शिक्षण हक्क कायद्याने दिलेल्या अधिकाराचा भंग होतो हे सर्वोच्च न्यायालय नमूद करते. तसेच केवळ धर्माच्या मुद्दय़ावर अशा प्रकारचा भेदभाव किती अयोग्य आहे हेदेखील न्यायाधीशद्वय बोलून दाखवतात. तथापि या साऱ्या सुनावणीत न्या. अभय ओक आणि न्या. पंकज मित्तल यांनी राज्य सरकारची जी पिसे काढली ती अधिक आश्वासक आहेत. ही घटना उघडकीस आल्यावर आणि सदर विद्यार्थ्यांच्या वडिलांनी गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केल्यावर पोलिसांनी दाखवलेला अनुत्साह अथवा गुन्हा दाखल करताना महत्त्वाच्या मुद्दय़ांना सोडून काही किरकोळ कलमे दाखल करणे आणि तसे झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने बोलून दाखवणे हे प्रशासनावर पूर्ण अविश्वास दाखवणे आहे. सर्वोच्च न्यायालय तो दाखवते आणि या प्रकरणाच्या चौकशीसाठी ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचा आदेश देत पुढे काय होते त्याचा अहवाल थेट न्यायालयास सादर करण्यास सांगते. यातून राज्य प्रशासनावरील अविश्वासच अधोरेखित होतो. सदर वादग्रस्त शिक्षिकेच्या कृत्यामुळे राज्य सरकारची सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली नसेल तर निदान सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टीका आणि टिप्पणीमुळे तरी ती जागृत व्हायला हरकत नाही; इतके न्यायवृदांचे बोल तिखट आहेत. पण तरी असे काही होईल ही अपेक्षा फोल ठरण्याची शक्यता अधिक. हा आता पायंडा पडून गेला आहे. गोमांस असल्याच्या संशयावरून वा अन्य कोणा कारणाने अल्पसंख्याकांस 'जागा दाखवून देणे' हे अनेकांस अलीकडे आपले कर्तव्य असल्यासारखे वाटते. अशा शौर्यकृत्यांस राजाश्रय मिळतो असा समजही निर्माण होताना दिसतो. तो अगदीच अस्थानी नाही. त्यामागे इतक्या वर्षांच्या अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनाचा इतिहास हे कारण असेलही. म्हणजे आधीच्या सत्ताधीशांनी अल्पसंख्याकांचे लांगूलचालन केले; म्हणून आता आम्ही बहुसंख्याकवाद अंगीकारणार असा राजकीय तर्क यामागे असेलही. पण एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारण्यात शहाणपण नसते. शिवाय सत्ताधीशांनी मनात सूडभावनेस थारा द्यायचा नसतो. सदर शिक्षिकेच्या कृत्यामुळे उत्तर प्रदेश सरकारकडून अशा भावनेचे दर्शन झाले असे थेट म्हणता येणार नाही; हे खरे. पण कृत्य चव्हाटय़ावर आल्यानंतर तरी सदरहू शिक्षिकेविरोधात सरकारने नियमाधीन चोख कारवाई केली असती तरी राज्यकर्त्यांविरोधात संशय निर्माण झाला नसता. ही संधी राज्य सरकारने गमावली.असे काही सर्वोच्च न्यायालयासंदर्भात म्हणता येते किंवा काय, हा प्रश्न. तो उपस्थित होतो कारण सर्वोच्च न्यायालय अनेक महत्त्वाच्या प्रकरणांत ताशेरे ओढण्यापलीकडे जाताना दिसत नाही, म्हणून. एखाद्या राज्याचा सभापती आपल्या पदाचा आब न राखता उघड पक्षपात करत असल्याचे प्रकरण समोर आहे? ओढ ताशेरे सभापतीवर! घटनात्मकदृष्टय़ा महत्त्वाच्या राज्यपाल पदावरील व्यक्तीने पदास अशोभनीय वर्तन केल्याचे दिसते? ओढा ताशेरे त्यांच्यावर! सरकारी यंत्रणा उघडउघडपणे नियमभंग करते आहे? पुन्हा ताशेरे आहेतच! अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील. पण त्यातून निर्माण होणारा प्रश्न तोच. भारतीय जनतेने सर्वोच्च न्यायालयाच्या या ताशेऱ्यांवर किती काळ भागवून घ्यायचे? कोणत्याही देशाच्या वर्तमानात एक वास्तव असे उभे ठाकते की त्या वेळी सदसद्विवेकवाद्यांनी काय असायला हवे त्याबाबत केवळ भाष्य न करता ते तसे असेल याची हमी आपल्या अधिकारांच्या अंमलबजावणीतून देण्याची गरज असते.

# मी कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही..

पण ज्या पद्धतीने पुण्यात काल ३६ हजार महिलांनी दगडूशेठ च्या गणपतीसमोर अथर्वशीर्ष पठण की काय म्हण-तात ते केलं त्याच पुण्यात महिलांना शिक्षण देण्यासाठी महात्मा फूलेंनी देशातली मुलींसाठीची पहिली शाळा सुरू करून आ-पली पत्नी सावित्रीबाई फूलेंना पहिली मुख्याध्यापिका बनवले आणि सावित्रीबाई फूलेंनी शेकडो अपमान सहन करत मुलींच्या शिक्षणासाठी संपुर्ण आयुष्य वेचले. आज मात्र देशातली मुलींची पहिली शाळा जपण्यासाठी पुण्यातील शंभर महिलाही एकत्र येत नाही. त्या पुण्यात सावित्रीबाई फूलेंनी सुरू केलेली ऐतिहासिक शाळा वाचवण्यासाठी त्यांनी दिलेल्या शिक्षणाचा वापर न होता पठणासाठी मात्र आवर्जून होतो. ही स्त्री शिक्षणासाठी आयुष्य वेचलेल्या फूले दांपत्याच्या कार्याची अवेहलना नाही का ?....

दु:ख महिला पठणासाठी बसल्या याचं नाही तर पुण्यातील मुलींच्या ऐतिहासिक शाळेची वास्तू पार निख-ळून पडली आहे. तीकडे महिलांचे लक्ष जात नाही. ती वाचवण्यासाठी अशा हजारो महिलां एकत्र आल्या तर सरकार कोणतही असूद्या सरकारला घाम फूटल्याशिवाय रहाण-ार नाही. असं काहीच महिलांकडून घडत नाही याचं दु:ख होतं.

आज प्रत्येक महिलेने शपथ घेतली पाहीजे की, फुले दांपत्याने मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेची ऐतिहासिक वास्तू वाचवण्यासाठी महाराष्ट्रातील समस्त महिलांना पक्ष-संघटना विसरून एकमेकींना आवाहन करून दुरावस्था झालेल्या आपल्या शाळेची ही अवस्था व ही वास्तू पुन्हा नव्याने उभी केली पाहिजे. त्यासाठी मी स्वतः पहीलं पुढे आलं पाहिजे, असे केले तर हज-ारो महिला एकत्र येतील आणि आपली पहीली शाळा पुन्हा मुक्त होईल आणि नव्याने सुरु देखील होईल. कोणीतरी हे पाऊल उचलायलाच हवे. महापुरूषांच्या त्यागाची जाण असणाऱ्या सर्वांच्या सोबतीची यामधे गरज आहे. याल ना सोबत ? द्याल ना साथ?..

चला तर मग एक पाऊल ज्योती-सावित्रीच्या त्यागासाठी.

# फुले,शाहू,आंबेडकर यांनी बहुजनांच्या जीवनात क्रांती घडवून आणली हे विसरू नका.

आम्ही बहुजन म्हणजे SC,ST,OBC,MINORITIES जे ८५ टक्के आहेत,काही बहुजनांना असे वाटते की फुले शाहू आंबेडकर यांनी आम्हाला काहीच दिले नाही. आमच्यासाठी काहीच केले नाही. परंतु अशा लोकांना सांगावेसे वाटते की वरील महामानवांनी आमच्या बहुजनाच्या जीवनात क्रांती घडवून आणली.काही बहुजन फक्त देव देवींच्या मागे लागून त्यांच्या मंदिरात जाऊन (लाथा खाऊन वापस येतात तो भाग वेगळा).काही बहुजन अजूनही देव देवीला आरती नैवेद्य,दान-दक्षिणा,बोकडाचा,कोंबड्याचा नवस,पेढे-लाडू वगैरे देतो.परंतु यापैकी कोणी छातीठोकपणे सांगू शकत नाही की आम्हाला देव देवीने नक्की काय दिले?. आपण सांगू शकता का?.

शेजारची बाई मंदिरात जाते म्हणून मी पण जाते हे एकच कारण आहे. बाकी सर्व थोतांड, पाखंड,अंधश्रद्धा आहे. बहुजना-तील महिलांमध्ये याचे प्रमाण फार आहे व ते दिवसेंदिवस वाढत आहे असे वाटू लागले आहे.परंतु महात्मा ज्योतिबा फुलेनी आम्हाला शिक्षणाची दारे खुली करून दिली.सावित्रीबाई फुलेंनी आम्हा बहुजनाच्या शिक्षणासाठी खूप कष्ट केले, अपमान सहन केले,उच्चवर्णीयांनी अंगावर खरकटे पाणी फेकले,शेण-माती दगड फेकले,ते सर्व आपल्याकरता सावित्रीबाईंनी सहन केले.परंतु बहुजन महिलांना अजूनही वड सावित्री पौर्णिमेची सती सावित्री दिसते. ज्या दिवशी बहुजन महिलांना सावित्रीबाई फुले दिसेल तो भाग्याचा दिन म्हणावा लागेल.

सावित्रीबाई फुले मुळेच आज आमच्या महिला राष्ट्रपती,प्रधानमंत्री,राज्यपाल, जिल्हाधिकारी,तहसीलदार इत्यादी मोठ मोठ्या पदावर विराजमान झालेल्या आहेत व तेवढ्यात दिमाखाने काम करीत आहेत.परंतु १८४८ च्या अगोदर आमच्या महिला फक्त चूल आणि मूल यातच गुंग होत्या. बहुजन महिलांनी थोडं मागे वळून पहावं व चिंतन करावं की महिलांना अच्छे दिन कोणामुळे आले.महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेयांच्यामुळे का देव देवीमुळे?.

देव देवीची पूजा पाठ होम हवन आपण २००० ते २५०० वर्षापासून करीत आहोत.पण तरीही या देव -देवी आपल्याला का पावल्या नाहीत?. कारण काय असू शकते याचा आपण कृपा करून शोध घ्यावा.अजून किती वर्षे आपण बहुजन मूर्ख बनवून राहणार आहोत?. अठरापगड जाती करता नोकऱ्या मिळाव्या म्हणून राजश्री शाहू महाराज यांनी २६ जुलै १९०२ ला जीआर काढून सर्व बहुजनांना नोकरीत आरक्षण दिले. त्यामुळे आज बहुजनांची मुलं मोठमोठ्या पदावर विराजमान झालेली आहेत. जर कोणाला वाटत असेल की ते स्वतःच्या मेहनतीने,अक्कल हुशारीने उड-डड ख,उड-डड -खख किंवा उड-डड-खखख अधिकारी झाले, तर तो त्यांचा फार मोठा भ्रम आहे.१९०२ च्या अगोदर जरा इतिहासात डोकावून बघितले तर मग आपल्याला समजेल की ही सर्व मेहेरबानी,आशीर्वाद राजर्षी शाहू महाराजांचे आहेत. त्यांच्यामुळेच आपण आज आरामाचे,विलासाचे,सुखाचे व आनंदाचे जीवन जगत आहोत. तुमच्यावर कोणत्याही देव-देवतांची मेहरबानी,आशीर्वाद नाहीतच.फुले,शाहू,आंबेडकर यांनी बहुजनांच्या जीवनात क्रांती घडवून आणली हे विसरून चालणार नाही.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी राऊंड टेबल कॉन्फरन्स (ठढउ) मध्ये झगडून आपल्यासाठी उजचचणछ-ङ -थ-ठऊ इंग्रजांकडून मंजूर करून घेतले. आपल्यासाठी त्यांनी अनेक कष्ट घेतले,अनेक अपमान सहन केले.उच्च विद्या विभूषित,विलायतेतून शिकून आलेल्या व्यक्तीला माननीय सयाजीराव गायकवाड साहेब यांच्या संस्थानांमध्ये मोठ्या पदा-ची नोकरी मिळाली,परंतु तेथील चपराची फाईल काठीने किंवा दुरून फेकून देत होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पिण्याचे पाणी सुद्धा मिळत नव्हते.



अशा या प्रकांड पंडिताने खूप मेहनत करून भारताला एक छान,सर्व समाविष्ट असे संविधान दिले. त्या संविधानामुळे समता,स्वातंत्र्य,बंधुता व न्याय या तत्त्वामुळे आज आपण बहुजन चांगली नोकरी करतो.गाव कुसा बाहेर न राहता शहराच्या मध्यभागी राहतो.फाटके तुटके कपडे घालत होतो,परंतु आता आपण सूट बूट कोट घालून फिरतो.तहान लागली असता आपल्याला सुवर्ण लोक २-३ फुटावरून ओंजळीत पाणी टाकत होते. ही गोष्ट सर्वांना माहीत आहेच.ही सर्व मेहरबानी,आशीर्वाद डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेच आहेत यामध्ये कोणतीच शंका नाही हे सर्व भारतीय बहुजन मान्य करतील.जर संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली असती तर भारत आज वेगळ्या परिस्थितीत दिसला असता.१९५० च्या अगोदर जर आपण आपली परिस्थिती बघितली तर आपले काय हाल होते ते नक्कीच दिसून येईल.अशा या उत्तम संविधानामध्ये प्रत्येक भारतीयाचा विचार केलेला आहे, परंतु काही मनुवादी संविधान बदलण्याची भाषा करीत आहेत.आता आ-पली प्रत्येकाची जबाबदारी आहे की प्राण गेले तरी चालतील,परंतु या पवित्र संविधानाचे रक्षण केले पाहिजे. फुले,शाहू,आंबेडकर यांनी बहुजनांच्या जीवनात क्रांती घडवून आणली हे विसरून चालण-ार नाही.असे केल्यामुळे आपल्या येणाऱ्या भावी पिढ्या आपल्याला धन्यवाद देतील.

महादेव डांबरे,९६६५०४७१५३.
छत्रपती संभाजीनगर,औरंगाबाद.

# सर्वश्रेष्ठ पदी बसलेल्या गुलामला जाणीव कशी करून देणार?

आपल्या जातीचा आमदार खासदार निवडून दिला तर तो आपले प्रश्न समस्या चुटकीसरशी संपविल ही भावना बहुजन समाजातील समाज बांधवांना समजली असे अशी अपेक्षा करतो.आज सत्तेत भाजप आहे,ते जोर शोर लावून सर्वत्र हिंदुत्वकरण करत आहेत.म्हणून त्यांनी सेंट्रल व्हिस्टाचे उद्घाटन करण्याची संधी मिळताच ते हिंदुराष्ट्री शैलीत राज्याभिषेकाने केले.कारण त्यांनी अगोदरच सर्वश्रेष्ठ पदी गुलाम बसून ठेवले आणि ३०३ खासदारांना वैचारिक गुलाम करून ठेवले.नवीन संसद भवनाच्या वेळी राष्ट्रपती ते एसी,एसटी,ओबीसी,आदिवाशी,अल्पसंख्याक खासदारांना प्रथम गुलाम बनविण्यात आले.त्यामुळेच एकाने ही या विरोधात आवाज उचलला नाही.अगोदर राष्ट्रपती एस सी चा होता त्याला प्रथम नागरिक म्हणून कोणत्याही हिंदूंच्या मंदिरात जाण्यास बंदी होती ती राष्ट्रपती म्हणून नाही,तर एसी मागासवर्गीय समाजाचा होता म्हणून मंदिरात प्रवेश नव्हता. तसेच नवीन संसद भवनाच्या भूमिपूजनाच्या वेळी ही त्यांची जात आडवी आली.आता ही नवीन संसद भवनाच्या उद्घाटनाच्या वेळी राष्ट्रपती ना नाकारण्यात आले.ती आदीवाशी महिला आणि त्यात ही ती विधवा होती म्हणूनच तिला ही नाकारण्यात आले.तरी त्यांना स्वताला आणि त्यांच्या जातीच्या अपमान झाला असे कधीच कोणाला का वाटले नाही.त्याविरोधात कोणीच बंड करून उठले नाही.कारण स्वाभिमान हा त्यांच्या रक्तात नाही.त्यांनी भारतीय संविधान वाचले नाही. म्हणूनच मी लिहतो सर्वश्रेष्ठ पदी बसलेल्या गुलामला जाणीव कशी करून देणार?. अन्याय अत्याचार सहन करण्याची सवय लागली की धनधाकड शरीर असलेला मानव,प्राणी चाबूकाचा गुलाम होतो. मालकाच्या हातात चाबूक दिसला की प्राणी घाबरतो तसाच माणूस पण घाबरतो. हा निसर्गाचा नियम आहे.त्याला तथागत बुद्धांनी प्रथम आवाहन देऊन मोडून काढले होते. त्यांनी शेठ सावकार शेतकऱ्यांच्याकडे काम करणाऱ्या गुलामांना मानवा सारखे वागविण्याची विनंती केली होती.त्यामुळे दोघांच्या वागण्यात बदल झाला आणि गुलामानी जास्त मेहनतीने काम केल्यामुळे उत्पादनात भर पडली होती.गुलाम शेतकरी,सावकार यातील भेद मिटला होता.



भारतात आज ही मागासवर्गीय जातीच्या माणसाला माणुस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारल्या जातो.त्यावर माणुसकीहीन अन्याय अत्याचार केल्या जातात.त्यावर कडक कारवाई करणारा अट्रोसिटी हा कायदा होता. अट्रोसिटी हा एक असा कायदा आहे की ह्या कायद्यामुळेच जातीय अत्याचार थोड्याफार प्रमाणात कमी होण्यास मदत होत होती. पण दि. २० मार्च, २०१८ रोजी विद्यमान सर्वोच्च न्यायालयाने ह्या कायद्याबद्दल करून खूप चुकीचा निर्णय घेतला आहे. परत, काही धनदांडगे जमीनदार जातीयवादी सक्रिय होऊन जातीय अत्याचाराच्या घटना वाढतील आणि राजकीय आशीर्वाद असल्यामुळे गुन्हे कसे पचवायचे हे तर यांना चांगलंच ठाऊक झाले आहे. शिक्षण आणि नोकरीतील आरक्षण नंतरचे पदोन्नती आरक्षण सर्व सनदशीर मार्गाने संपविण्याचे षड्यंत्र सुरु असतांना ही समाजातील गट-तट, राग, द्वेष, तिरस्कार, अहंकार आणि स्वार्थ काही कमी होतांना दिसत नाही.आणि सर्व मागासवर्गीय समाज एकत्र करण्याचा प्रयत्न करीत नाही. ही खुप खेदाची व क्रांतिकारी विचाराला मूठमाती देणारी परिस्थिती आता निर्माण झाली आहे.त्यामुळेच नवीन संसद भवनाच्या उद्घाटना सोहळ्यात मतदारांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी दिसले नाही.तर ढोंगी अनपड,लायकी नसणारे उघडे नागडे साधू दिसले.

देशात लोकशाही पद्धतीने निवडून आलेले १३१ मागासवर्गीय खासदार आहेत.विशेष म्हणजे एक खासदार भारत देशाचा सर्वोच्च पदी म्हणजे राष्ट्रपती पदी आहे एक ओबीसी खासदार देशाचा प्रधानमंत्री आहे.तरी एस सी,एस टी, ऍक्ट आणि आरक्षणाच्या निमावली मध्ये नुसता बदल नाही तर निष्कीर्य करून टाकला. ही घटना साधी नाही तर लोकशाही ने दिलेल्या संविधानिक मूल्याचा आपल्या सोयी नुसार ब्राम्हणशाहीने केलेला सरळ खुनच होता.तरी मागासवर्गीय खासदार,प्रधानमंत्री,राष्ट्रपती आपल्या सामाजिक जबाबदारीशी प्रामाणिक न राहता वैचारीक गुलाम म्हणून इनामदारी ने आपले कर्तव्य पार पाडत आहेत. आपण गुलाम आहोत यांची त्यांना संपुर्ण जाणीव आहे.मग या वैचारिक गुलामला जाणीव कशी करून देणार?.हा आज देशातील मागासवर्गीय समाजा समोरचा मोठा प्रश्न आहे.या मागासवर्गीय लोकांना लोकप्रतिनिधी म्हणून कोणी निवड केली?.ब्राम्हणशाहीचे व्यवस्थापन करणाऱ्या आर एस एस च्या भटा ब्राम्हणांनीच नां?.

मागासवर्गीय बहुजन समाजातील पक्षाच्या वतीने स्वाभिमानी ओबीसी प्रधानमंत्री किंवा राष्ट्रपती झाला असता काय?.मग बहुसंख्य हिंदुत्ववादी,मनुवादी विचारधारा मानणाऱ्या पक्षांनी ओबीसी प्रधानमंत्री व मागासवर्गीय राष्ट्रपती कोणत्या गुणवंते नुसार निवडल्या गेले तर एकच गुणवत्ता आहे ती म्हणजे वैचारिक गुलाम. ही मोहनचंद गांधी यांच्या यरोडा जेल पुणे येथील आमरण उपोषणाला बसल्या नंतर झालेली उत्पत्ती आहे.त्यालाच पुणे करार म्हणतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या स्वाभिमानी समाजाला वाचविण्यासाठी मजबुरी मुळे केलेला समझोता होय.त्याचं गुलामांचा वापर करून आज देशातील लोकशाही संपविण्याचे काम मनुवादी करीत आहेत.नवीन संसद भवनाचा उद्घाटन सोहळा उघड पुरावा त्यांनी आदर्श म्हणून देशवाशियांच्या समोर ठेवला.

सर्वश्रेष्ठ संविधानिक पदी ओबीसी,मागासवर्गीय गुलाम बसविल्यामुळे कोणतेही मानसिक गुलाम नेतृत्व स्वतःच्या किंवा संविधानाच्या चौकटीत काम करू शकत नाही.तो गुलाम स्वतःसह सर्व ओबीसी, मागासवर्गीय समाजाला कायमस्वरूपी गुलाम बनविण्यासाठी काम करीत राहील. भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी होणार नाही यासाठी प्रथम समता,स्वतंत्र,बंधुभाव,एकता सर्वधर्मसमभाव ही चौकट मोडावी लागेल.ती तोडण्यासाठी संविधानात दिलेले मूलभूत अधिकार,सनदशीर कायदे कानून,कलम बदलल्या शिवाय मनुवादी,हिंदुत्ववादी विचारांची अंमलबजावणी होणार नाही हे सर्व काम ओबीसी,मागासवर्गीय गुलामांच्या हातुन सहीने आज देशात होत आहे.त्याला सर्वच ओबीसी,मागासवर्गीय,बहुजन समाज मूक पणे साथ देतो किंवा तो ही त्यांची मानसिक गुलामी सहन करण्यासाठी तयार होत आहे. त्यामुळे त्यांच्या सर्व नाशाला तोच जबाबदार असेल. आर एस एस प्रणित भाजपा एकमेव पार्टी नाही तर तिला ४६ छोट्या छोट्या प्रादेशिक पक्षाचा पाठिंब्यामुळे ती मजबूत होत आहे.हे ४६ पक्ष मागासवर्गीय,बहुजन समाजाला मानसिक गुलाम बनविण्यासाठी कुराडीच्या दांड्याचे काम करीत आहेत. हे स्वार्थासाठी आंधळे, बहिरे आणि मुके झाले आहेत.त्यात रामदास हा लक्षवेधी गुलाम आहे.या गुलामला जाणीव कशी करून देणार?.आर एस एस ने सर्व साम,दाम,दंड,भेद नीती वापरून या पक्षांना सहयोगी गटबंधन, ठगबंधन आणि राजकीय सौदेबाजी केली आहे.त्यामुळे हे सर्व पक्षाचे नेतृत्व करणारे नेते गुलाम झाले आहेत.

शिवसेना व शिवसेना पक्ष प्रमुख यांची एकूण भाषणे ऐकली तर मोठा प्रश्न पडत होता. हीच का ती वाघाचे तोंड घेऊन मराठी, महाराष्ट्र आणि महाराजांचा आदर्श सांगणारी सेना?. की मनुवादी हिंदुत्ववादी गुलाम?. मराठी माणसाला महाराष्ट्राला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना गुलाम बनविणारी सेना.ओबीसी मागासवर्गीय,बहुजन समाजाला गुलाम बनविणारे नेतृत्व मग ते कोणाचे ही असो ते गुलाम झाले नाही, तर कसे संपविल्या जाते हे शिवसेना आणि शिवसैनिक अनुभवत आहेत. त्यांची शिक्षा महाराष्ट्र राज्यातील मतदार भोगत आहे.त्यामुळेच असा गुलामांना गुलामगिरीची जाणीव कशी करून देणार?.हे संत,महापुरुषांच्या,महात्माच्या क्रांतिकारी विचारावर श्रद्धा ठेवणाऱ्या संस्था,संघटना,कार्यकर्ते आणि नेते यांनी गांभीर्याने विचार करून मार्ग काढला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे करारावर सही केली तेव्हा जी खंत व्यक्त केली होती,जर माझा समाजाची राख रांगोळी होऊन तो जिवंत राहत् नसेल तर मी जिवंत् राहून काय उपयोग?.

ओबीसी,मागासवर्गीय,बहुजन समाजाची आजची परिस्थिती तशीच आहे.८५ टक्के समाज असूनही त्यांच्यावर ३ टक्के लोकसंख्या असलेला समाज त्यांना गुलाम बनवीत आहे. कारण ओबीसी, मागासवर्गीय, बहुजन समाजात एकी नाही. एकमेकांवर विश्वास नाही.म्हणून त्यांना गुलामी स्वीकारावी लागत आहे.समाजाचे किंवा देशाचे नेतृत्व करण्यासाठी वयाची अट नसते.तर वैचारिक धाडस आणि इच्छाशक्ती पाहिजे.सर्वच मागासवर्गीय समाजाच्या नेतृत्वाने ते गमावलेले दिसते.म्हणूनच ते सर्वश्रेष्ठ पदी बसलेले असतांना ही वैचारिक गुलामी स्वीकारत आहेत.मग त्यांना जाणीव कशी करून देणार?. वाघ कधीही जंगलात शिकार एकटाच करतो,पण कळपात राहतो.माणसात जसा अहंकार, स्वाभिमान असतो तसाच प्राण्या मध्ये असतो.दोन मित्र गैरसमजा मुळे शत्रु बनतात तसेच प्राण्यात सुद्धा होते.संकट समयी माणुस जसा माणुस म्हणून धाऊन जातो तसाच प्राण्यांच्या संकट समयी प्राणीच धाऊन जातो.एकदा एक वयस्कर वाघ शिकार करण्यासाठी फिरत असतांना पंचवीस तीस कुत्रे त्याला घेरतात व त्यांच्यावर जोर जोराने भुंकून हल्ला करतात.तो आवाज ऐकून दुसरा वाघ त्या वाघाच्या मदतीला धावून जातो.तो फक्त दाहडतो तर सर्व कुत्रे पळून जातात.वयस्कर वाघ उभा राहतो आणि सावरतो तो पर्यंत मदतीला धावून आलेला वाघ निघून जातो.इतर प्राणी हे सर्व पाहत होते,त्यांनी त्या वाघाला विचारले तुम्ही एकमेकांशी बोलत नाही.मग त्यांला वाचविण्यासाठी का गेला?.तेव्हा ते वाघाने उत्तर दिले आमची आपसात नाराजी,गैरसमज जरी असले तरी एकूण प्राणी समाजात असा समज जाऊ नये की कुत्रे ही वाघाला मारून टाकतात. देशात ८५ टक्के ओबीसी, मागासवर्गीय बहुजन समाजाच्या रक्षणासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रत्येक वेळी धाऊन आले.आणि आज ही ओबीसी, मागासवर्गीय,बहुजन समाजाच्या रक्षणासाठी आंबेडकरी विचारांचे लोक परिणामाची पर्वा न करता लिहण्यासाठी, बोलण्यासाठी, लढण्यासाठी पुढाकार घेतात. गुलामला गुलामगिरी ची जाणीव करून देतात. मग आता सर्वश्रेष्ठ पदी बसलेल्या गुलामला जाणीव कशी करून देणार?.

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# गावोगाव दारू, चला विकास करू

राजकारण अर्थात देशातील संसद व राज्यातील राज्य विधी मंडळ हे नागरिकांच्या समस्या सोडवून राष्ट्र व राज्य यांना सुधारणा व विकासाच्या जोरावर मजबूत करण्याचे केंद्र बिंदु आहेत. जनकल्याण, राष्ट्रहित याच ठिकाणाहुन जोपासले जावे अशी तरतूद आहे. लोकांच्या हिताचे निर्णय घेऊन, लोकांचाच पैसा लोकांसाठी खर्च करून लोकांना अन्न, वस्त्र, निवारा शिक्षण, आरोग्य सुविधा देऊन मुलभूत समस्या दुर करण्यासाठी लोकसेवक अर्थात आमदार खासदार निवडून दिले जातात. प्रत्येक आमदार खासदार यांनी आपापल्या मतदार संघातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक ज्या काही समस्या असतील त्या समस्या जाणून घेऊया त्या तात्काळ सोडवण्याची जबाबदारी त्या लोकप्रतिनिधींची असते. या साठी दरवर्षी लाखों करोडो रूपयांचे बजेट जाहीर करून घोषणांचा पाऊस पाडला जातो. बजेटच्या पेरणीत आश्वासनाचा पाऊस पाडूनही विकास कामाचे व समस्या निर्मुलनाचे पिक उगवत नाही म्हणून समस्या वाढत जाऊन आमदार खासदार करोडपती होऊन देश व देशातील नागरिक मात्र कंगाल झाले. देशावर देशाच्या नावाने व देशात जनतेता कर्ज बाजारी आहे. सरकारने देशाच्या नावाने घेतलेले कर्ज देशातील च जनतेला फेडायचे आहे आणि जनतेचे कर्ज जनतेलाच फेडायचे आहे. म्हणजे आज जनता दुहेरी कर्जाच्या विखळ्यात अडकलेली आहे. दरवर्षी लाखो करोडोचे विदेशी कर्ज घेतले जाते, देशातील नागरिकांकडून झोपेतून उठल्या पासून झोपेपर्यंत जे काही वापरले जाते त्या प्रत्येक बाबींवर जास्तीचे कर आकारून सरकार महसूल जमा करत असतो. एवढे सारे करून सरकारने कर्मचाऱ्यांचे पेन्शन, नवीन कायमस्वरूपी भरती बंद करून पैसा वाचवायला सुरवात केली. कंत्राटी भरती करून कर्मचाऱ्यांना पगार कमी व कंपनीला नफा जास्त असे धोरण आखुन सरकारी नोकरी बंद करण्याचे षडयंत्र सुरू केले. सार्वजनिक संस्था विकुन पैसा मिळवला मग प्रश्न पडतो एवढा सारा पैसा नेमका खर्च होतो तरी कुठे? शिक्षणाचे खाजगीकरण, नोकरी चे खाजगीकरण, आरोग्य सुविधा व्हेंटिलेटरवर, सरकारी कार्यालये जुनेच, शाळेला रंगरंगोटी नाही, शासकीय कार्यालयतील स्वतः गृहाचा स्वच्छतेचा व पिण्याच्या पाण्याचा विषय गंभीर आहे. सरकारने कर्ज काढून, शासकीय मालमत्ता विकुन बचत करण्याचा प्रयत्न केला. नोकरी, शिक्षण, आरोग्य सुविधेवरचा खर्च करून बचत करण्याचा प्रयत्न केला मग अजून महसूल निर्माण करण्याची गरज का केली. अगोदर हे तर स्पष्ट करून द्यावे कि देशातील संपती विकुन, विदेशी कर्ज काढून, जास्तीचे कर लादुन गोळा केलेला पैसा नेमका खर्च करतात तरी कुठे? खर्चाचा हिशोब सार्वजनिक का केला जात नाही? सरकारचे मुख्य काम प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पुर्ण व मोफत शिक्षण आहे त्याच ठिकाणी देणे. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून मदत करणे, शिक्षण संपल्यानंतर योग्यते नुसार शासकीय कायमस्वरूपी नोकरी देणे. आयुष्यभर शासकीय सेवा केल्यानंतर वृद्धापकाळात नागरिकांना मानासन्माने जिवन जगता यावे म्हणून पेंन्शन देणे हे काम सरकारचे आहे. हे करताना नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा देऊन इतर हक्क अधिकाराचे संरक्षण करून महागाई वर नियंत्रण ठेवण्याचे काम सरकारचे आहे. शैक्षणिक संस्था कंपनीला देऊन शिक्षणाचा बाजार सरकार करत आहे. एकिकडे मोफत धान्य देणाऱ्या देशात महाग शिक्षण मोफत धान्य वाल्यांना परवडणारे आहे का? मोफत धान्य दिले जाते कारण त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने मोफत धान्य देणारे सरकार जर शिक्षणाचा बाजार करत असेल तर सर्व सामान्य लोकांनी मुलांना शिकवायचे कसे? शिक्षणाने विद्यार्थी अधिकारी होतात, परंतु शिक्षण नसेल तर तेच भिकारी होतील. आणि भिकारी माणसाला स्वाभिमान गहाण ठेऊन लाचारी करावी लागते. थोडक्यात काय तर सरकारचे धोरणे सर्व सामान्य मुलांना अधिकारी नाही तर भिकारी बनवण्याचे आहेत. सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या ही सर्वांत मोठी समस्या असताना त्यांच्या हाताला काम नाही. सरकारने तरुणांच्या हाताला काम देण्याऐवजी नवीन दारूचे दुकाने उघडण्याचा निर्णय घेऊन हातात दारूचा ग्लास देण्याचा निर्णय घेतला आहे. तरूणांना व्यसनाधीन बनवून महसूल गोळा करण्याच्या नावाखाली कंपन्यांचा उद्धार करण्याचा अजेंडा सरकार राबवत आहे. शाळा बंद पाडून दारूचे दुकान सुरू करणे खरचं हे नैतिक दृष्टीने शोभणारे कृत्य आहे का? बर शाळा कोणत्या कंपण्या चालवणार तर ज्या कंपन्याचे लाखो करोडो रुपये कर्ज सरकारने माफ केले. अशा दिवाळखोरीत निघालेल्या कंपन्या शिक्षण स्वतः कडे घेऊन शिक्षणाचे दिवाळे केल्याशिवाय शांत बसणार नाहीत. फेक कोरोना महामारी मध्ये लोकांची काळजी आहे असा आव आणून लोकांच्या सुरक्षितेच्या नावाखाली जबरदस्तीने लसीकरण करण्यात आले. लसीकरणा नंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात लसीकरण सत्तीचे नसुन ऐच्छिक होते. आणि त्याच्या दुष्परिणायाबद्दल सरकार जबाबदार राहणार नाही असे प्रतिज्ञापत्र सादर केले तो भाग वेगळा. लसीकरणा नंतर लोकांचे आजार व मृत्यू वाढले हा भाग स्वतंत्र चर्चेचा विषय असला तरीही लोकांच्या आरोग्यासाठी लसीकरण सरकारने जबरदस्ती करून घेतले. याचाच अर्थ सरकारला लोकांच्या आरोग्याची काळजी आहे असा मुळीच नाही. कारण काही दिवसा अगोदर एक संशोधन अहवाल समोर आला. त्या अहवालानुसार दारूचा एक घोटही कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. जर दारूमुळे कर्करोग होऊ शकतो हे माहिती असताना दारूचे दुकान सुरु करण्याचा निर्णय घेणे म्हणजे लोकांच्या आरोग्याशी खेळणे होय. दुसरी गोष्ट म्हणजे बेरोजगार तरुण व्यसनाच्या आहारी गेले तर व्यसनाधीन व बेरोजगार तरुण चुकीच्या मार्गावर जाऊन चोर आणि दरोडेखोर बनल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे शाळा सुरू करून ज्या तरूणांना शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार देऊन त्याला अधिकारी कर्मचारी सरकारने बनवायला पाहिजे तेच सरकार शाळा बंद करून दारूचे दुकान सुरू करून तरूणांना भिकार आणि लाचार बनवून सोडेल. महसूल गोळा करण्याच्या नावाखाली दारूची दुकाने सुरू केल्या पेक्षा आठ दिवसांत बावीस लाख रुपयांचे जेवण करणाऱ्या आमदार खासदार यांच्या कडून महसूल गोळा का केल्या जात नाहीत? जे लोक चार्टर्ड विमानाने गुवाहाटी जाऊन मौज मस्ती करून करोडो चा चुराडा करतात त्यांच्या कडून महसूल का गोळा होत नाही? राज्यातील सत्ता बदल होताना तिन हजार करोड रुपये खर्च झाल्याच्या बातम्या प्रसारित झाल्या, प्रती व्यक्ती पन्नास कोटी रुपये घेतल्याचे आरोप करण्यात आले. परंतु हे आरोप आहेत यात कोणतेही तथ्थ नाही यासाठी ज्यांच्या वर आरोप झाले त्यांनी स्वतः ची, कुटूंबाची व जवळच्या नातेवाईक यांची चौकशी करा पण पैसे घेतल्याचे सिद्ध करून दाखवा असे आवाहन कोणीच केले नाही याचा अर्थ पन्नास कोटी मध्ये तथ्थ आहे. जर सत्ता बदल करताना तिन हजार करोड रुपये खर्च होऊ शकतात तर मग दोनशे कोटी साठी दारुची दुकान सुरू करण्याची वेळ सरकार वर का आली? मुंबई महानगरपालिका मधील मधील नगरसेवक फोडण्यासाठी सातशे करोड रुपये खर्च करण्यात आल्याच्या बातम्या समोर आल्या. जर फोडाफोडीचे राजकारण करण्यासाठी हजारो करोड रुपये खर्च होत असतील तर दोनशे करोड रूपयां साठी कोणी लोकांच्या जिवाशी खेळून त्यांचे आजार व कर्ज वाढवून लाचारीचे मरण देणार नाही ही बाब सत्य आहे. सरकार ने लोककल्याणाचे धोरणे आखण्या ऐवजी लोकांच्या समस्या वाढत कशा जातील अशी धोरणे आखुन सर्वसामान्य लोकांचे जगणे अवघड केले आहे. गावोगावी शिक्षण सुविधा, आरोग्य सुविधा, रोजगार केंद्र विकसित करून लोकांचा सर्वांगीण विकास करण्या ऐवजी गावागावात दारूचे दुकान उघडून सरकार नेमका कोणाचा विकास करणार हा विषय मात्र संशोधनाचा आहे. गावागावात दारू सुरू करण्याचा निर्णय हा आजच एकदम घेतला गेला नाही तर २०१९ पासून गावोगावी दारू, तिन हजार लोकसंख्या मागे एक दारुचे दुकान असा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राजकारणाला जाती धर्माशी जोडून या निर्णयाला विरोध सर्व सामान्य लोकांकडून करण्यात आला नाही. लोक जागृत नसल्याचा व धर्माच्या नावावर लोक विरोध करत नाहीत हे लक्षात येताच गावातील शाळा खाजगी कंपनीला देऊन शिक्षण महाग व दारूचे दुकान गावातच सुरू करून दारुची व्यवस्था गावातच करून आपण विकासाच्या दिशेने जात आहोत. जनतेच्या समस्या काय? त्या सोडवायच्या कशा? शिक्षण, आरोग्य, रोजगार यापासून सरकार दुर कसे जाऊ शकते? असे प्रश्न सर्वसामान्य लोकांनाच पडत नाहीत म्हणून सरकार चुकिचे ध्येय धोरण आखून समस्या वाढवत असते. एका घरात एक दारूड्या असल्यावर त्या घराची परिस्थिती काय होते हे केवळ त्या घरात राहणाऱ्यांना माहिती असते. आता दारुचे दुकान गावातच म्हणल्यावर लोकांचा ओढा दारूच्या दुकानाकडे जाऊन व्यसनाधिन, कर्जबाजारी होतील पण शासनाला महसूल गोळा करून देतील मग शासन व्यसनमुक्ती चे कार्यक्रम सुरू करून लोकांच्या आरोग्याची काळजी घेईल व विकासाचा डोंबारा जाहिराती मधुन मिरवेल. जनतेच्या हिताचे काम करण्याची जाणीव जर लोकप्रतिनिधींना करून द्यायची असेल तर आपण बँलटपेपर वर निवडून घेण्याचा आग्रह धरावा. तरच सत्ताधारी लोकांवर वचक बसेल. ईव्हीएम च्या माध्यमातून निवडून झाल्या तर येणारा काळ खुपच चिंताजनक असेल. आणि आजही लोक जागृत होऊन समोर आले नाही तर गावोगावी दारू, चला आपण विकास करू असेच म्हणावे लागेल.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# ५ हजार कोटींच्या ठेवी, हे जिल्हा बँकेचे लक्ष्य

## अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांचा संकल्प; लातूरची बँक ही पुणे, सांगलीच्या बरोबरीने





लातूर : देदीप्यमान इतिहास लाभलेली लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पन्नाशीकडे वाटचाल करीत आहे. त्यामुळे बँकेच्या ठेवीत वृध्दी करून त्या ५ हजार कोटी रुपयांपर्यंत घेवून जाणे, हे आता आमचे लक्ष्य आहे. हा टप्पा आम्ही गाठला तर येणाऱ्या काही वर्षांत बँकेच्या व्यवसायाची वाटचाल १० हजार कोटी रुपये झालेली असेल, असा संकल्प जिल्हा बँकेचे अध्यक्ष, आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मांडला.
राज्यातील अग्रगण्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेपैकी एक असा नावलौकिक मिळवलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा सहकारमहर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी संपन्न झाली. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष, आमदार श्री. धिरज देशमुख यांनी उपस्थितांशी संवाद साधून बँकेची आजवरची वाटचाल आणि पुढील धोरणे जाहीर केली.
अध्यक्ष श्री. धिरज देशमुख म्हणाले, मला माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या आशीर्वादामुळे आणि आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे बँकेचा चेअरमन होण्याची संधी मिळाली. बँकींग क्षेत्रात काम केलेले अनुभवी संचालक मंडळ सोबतीला मिळाले. त्यामुळे बँकेच्या निवडणुकीत दिलीपराव देशमुख यांनी आपल्या सर्वांना दिलेला शब्द, दिलेले आश्वासन हे आदेश मानून ते आम्ही प्रथम पूर्ण केले. त्यांनी नव्या संचालक मंडळावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या.

**आमची आश्वासने म्हणजे जुमलेबाजी नव्हे :**
जिल्हा बँकेच्या योजना लोकांपर्यंत नेल्या. लाभार्थ्यांची संख्या वाढवली. शेतकऱ्यांचा वाढता खर्च, जमिनीचे कमी क्षेत्र याचा विचार करून पूर्वी सुरू केलेली बिनव्याजी ३ लाख रुपयांची योजना ५ लाखांपर्यंत वाढविली. याचा अधिकाधिक शेतकऱ्यांना फायदा झाला. बँकेने मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केले आणि वसुलीही जवळपास १०० टक्के केली. शेतकऱ्यांना १०० हार्वेस्टर देण्याचे धाडस आम्ही केले. असे धाडस इतर एकही बँकेने केले नाही. हल्ली आश्वासनांना जुमलेबाजी म्हंटले जाते. पण, आमची आश्वासने जुमलेबाजी नाही. ती तुम्हाला आश्वासनपूर्तीमुळे प्रत्यक्ष अनुभवता येतात, असेही अध्यक्ष श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.

**केवळ १ लाखापासून सुरवात :**
अध्यक्ष श्री. धिरज देशमुख म्हणाले, सन १९८४ मध्ये लातूर जिल्हा बँकेचे १ कोटी ३१ लाख रुपयांचे भागभांडवल होते आणि निव्वळ नफा १ लाख रुपयांचा होता. या केवळ १ लाखापासून सुरवात झाली आहे. दिलीपराव देशमुख यांनी कठोर परिश्रम, शिस्त, काटकसर, आर्थिक नियोजन करीत, शेतकऱ्यांना केंद्रभागी ठेवून अनेक धाडसी निर्णय घेतले. या निर्णयांना सर्वांनी सहकार्य केले. त्यामुळे आज २०२३ मध्ये बँकेचा व्यवसाय साडेसात हजार कोटीवर पोहचला आहे. बँकेचा ११० कोटींचा ढोबळ नफा आहे. १९१७ मध्ये अस्तित्वात आलेल्या पुणे जिल्हा बँक आणि १९२७ मध्ये स्थापना झालेल्या सांगली जिल्हा बँकेच्या व्यवसायाचा अभ्यास केला तर १९८४ मध्ये सुरू झालेली लातूर जिल्हा बँक आज त्यांच्या बरोबरीने आहे. हे सहजासहजी झालेले नाही. दिलीपराव देशमुख यांच्या दूरदृष्टीमुळे हा दिवस आपण अनुभवत आहोत.

**शेतकऱ्याचा मुलगा इंग्लंड, किर्गिस्तानमध्ये :**
ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जिल्हा बँकेने प्रस्ताव मंजूर केल्याने अनेक विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्यामुळेच लातूरमधील शेतकऱ्यांची मुले अमेरिका, इंग्लंड, रशिया, किर्गिस्तान अशा वेगवेगळ्या देशात शिकत आहेत. रेशीम शेतीसाठी कर्जमर्यादा वाढवून ३ लाख २५ हजार एवढी केली आहे. शासकीय - निमशासकीय पगारदारांसाठी कर्जसुविधा उपलब्ध करून दिली. महिला बचत गटासाठी कर्जमर्यादा ५ लाखांपर्यत वाढवली आहे. पेन्शन व प्रोत्साहनपर योजनेचाही लाभ मिळवून दिला आहे, असे अध्यक्ष श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.

**बँकेची वाटचाल कॅशलेस सुविधेकडे :**
शिवराज पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन तर अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली चालणारी ही बँक आहे. त्यामुळे आपण अनेक जनहिताची कामे केली. राज्यातील अग्रगण्य बँकांमध्ये आपले स्थान आहे. बँकेत कॅशलेस सुविधा आपल्याला लवकरच सुरु करायची आहे. बँकींग क्षेत्रात ज्या आवश्यक सुविधा आहेत, त्या सभासद, ग्राहकांना मिळवून देत बँकेला अधिकाधिक सक्षम बनवायचे आहे. आणखी यशोशिखरावर घेऊन जायचे आहे. त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहे. म्हणूनच आमचा ग्राहक आता जिल्हा बँकेकडे कमर्शिअल बँकेच्या दृष्टिकोनातून पाहत आहे, असेही अध्यक्ष श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.
यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, त्र्यंबक भिसे, आबासाहेब पाटील, श्रीशैल उटगे, प्रमोद जाधव, अशोकराव पाटील निलंगेकर, अशोक गोविंदपूरकर, जगदीश बावणे, यशवंतराव पाटील, श्रीपती काकडे, विजय पाटील, एन. आर. पाटील, व्यंकटराव बिराजदार, राजकुमार पाटील, पृथ्वीराज शिरसाठ, अनुप शेळके, मारोती पांडे, जयेश माने, भगवानराव तळेगावकर, दिलीप पाटील नागराळकर, स्वयंप्रभा पाटील, सपना किसवे, लक्ष्मी भोसले, अनिता केंद्रे, सुनील कोचेटा, हणमंत जाधव आदीसह बँकेचे व विविध सहकारी संस्था, संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.
----
बँकेची वाटचाल
(रक्कम कोटीत)
भाग भांडवल : १६४.०३
ठेवी : ३८२७.७८
दिलेली कर्ज : ३५०८.६६
एकूण व्यवसाय : ७३३६.४४
ढोबळ नफा : ११०.९२
निव्वळ नफा : २५.२३
---

# स्वच्छतेसाठी करूया एक तास श्रमदान !

# गांवाचे जरी उत्तम नसलें।तरि देशाचे भविष्य ढासळले

संत तुकडोजी महाराजांनी रचिलेल्या ग्रामगीतेतील पहिल्याच अध्यायातीलही ५०वी ओवी. गाव चांगले असेल तरच देशाचे भविष्यही चांगले होते, असा त्यांचा संदेश. गावच्या विकासासाठी संतानी आपापल्या परिने प्रयत्न केले.त्यातीलच संत गाडगेबाबा व तुकडोजी महाराजांचे योगदान महत्वाचे मानले जाते. देव-देवतांच्या पूजेबरोबरच श्रमातून भक्ती करा. गाव चांगले स्वच्छ ठेवा. त्यामुळे देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल, ही शिकवण त्यांनी युवकांना देण्याचा प्रयत्न केला. सद्यस्थितीत ग्रामीण व शहरी भागात स्वच्छतेला महत्व दिले जात असून याकरिता स्वच्छ भारत अभियान राबविले जात आहे. येत्या १ ऑक्टोबर रोजी देशात सर्वत्र स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत स्वच्छतेसाठी एक तारीख-एक तास अभियान राबविले जाणार आहे. यामध्ये सर्वजण सक्रीय सहभागी देवून आपला परिसर, गाव, शहर स्वच्छ करूया ! घरांची, गावांची, परिसराची स्वच्छता करून सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान उंचवावे, यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. 'स्वच्छतेतून समृध्दीकडे' ही संकल्पना यामुळे मूर्तरुपात येण्यास मदत होईल. आपण विदेशातील शहरांची स्वच्छता पाहून त्यांचे गुणगान गातो, मात्र तेथील स्वच्छता, शिस्त, सौंदर्य, सृष्टी व हिरवळ वाखाणण्याजोगी आहे, ती केवळ तेथे राहणाऱ्या लोकांमुळेच. त्यांच्या स्वच्छतेच्या सवयीमुळेच आहे, हे मात्र आपण विसरतो. आपण आपल्या मनाला, शरीराला, घराला, परिसराला स्वच्छ बनविण्यासाठी पाऊल उचलण्याची नितांत आवश्यकता आहे. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो. पण आपला परिसर स्वच्छ ठेवत नाही. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांमुळे आपले आरोग्य धोक्यात येऊन आपला घामाचा पैसा व वेळ वाया जात आहे. आज सार्वजनिक ठिकाणी बसमध्ये, लोकल, ऑफिस, उदयान, इमारती, रस्त्यांवर, गल्ली बोळांत, आपल्याला अस्वच्छता दिसते. कुठेही थुंकणे, पान खाऊन पिचकारणे, सिगारेटची थोटके, खाद्य पदार्थांची वेष्टने, कागदाचे तुकडे, तंबाखू, गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगविलेल्या भिंती दिसतील. कचऱ्याचे डोंगरच्या डोंगर शहरांमध्ये तयार होत आहेत. कितीजण आपल्या मुलांना स्वच्छतेचे महत्व सांगातात? त्याचे अनुकरण करायला सांगतात ? आणि स्वत: ही त्याचे अनुकरण करतात ? आपल्याकडे अनेक रोग हे अस्वच्छतेमुळे होतात. त्यामुळे घराची व परिसराची स्वच्छता हे उत्तम आरोग्यासाठी आवश्यक आहे. आपले मन स्वच्छ, तर आपले घर स्वच्छ। आपले घर स्वच्छ, तर आपला परिसर स्वच्छ।।




या उक्तीप्रमाणे स्वच्छता राखण्यासाठी स्वत: पासून सुरुवात करावी लागेल. त्याच प्रमाणे मी स्वत: ही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आठवड्यातून किमान एक तास स्वच्छता करण्याचा संकल्प करुन तसा प्रयत्नही सुरु केलेला आहे. त्याचप्रमाणे मी स्वत: ही घाण करणार नाही व दुसऱ्यालाही घाण करु न देण्याचा प्रयत्न करीन. सर्व प्रथम मी स्वत: पासून, माझ्या कुटूंबा पासून, माझ्या गल्ली किंवा वस्तीपासून, माझ्या गावा पासून ते कार्यस्थळापर्यंत या कामास सुरुवात करीन, असा निश्चय प्रत्यकाने करावा लागणार आहे. आपण केवळ वैयक्तिक स्वच्छतेवर भर न देता सामुदायिक पातळीवर एकत्र येवून काम करण्याची गरज आहे. यामुळे आपण केवळ वैयक्तिक स्वार्थ साधत नाहीतर, ती एक मोठी देश सेवा व निसर्ग सेवाही आहे. त्यामुळे आपण सर्वजण स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत 'स्वच्छतेसाठी एक तारीख-एक तास' उपक्रमात सक्रियपणे सहभागी होवून आपला परिसर, आपला गाव, शहर स्वच्छ करण्यास हातभार लावूया...!!

- उद्धव फड, संवाद तज्ज्ञ

# दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या कुख्यात आरोपींना ४ पिस्टल, एक गावठीकट्टा व ५९ जिवंत काढतुस, दरोडाच्या साहित्यासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी..

लातूर :- दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या कुख्यात आरोपींना ४ पिस्टल, एक गावठीकट्टा व ५९ जिवंत काढतुस, दरोडाच्या साहित्यासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी..* याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्ह्यात घडणाऱ्या चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी पोलीस रात्रगस्त व रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करण्याची मोहीम संपूर्ण लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.तसेच कोंबिंग ऑपरेशन राबवून चोरी, घरफोडी करणाऱ्या आरोपींना,फरार आरोपींना ताब्यात घेतले जात आहे. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्यात येत आहे. दिनांक २८/०९/२०२३ रोजी चाकूर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांना बातमीदार कडून माहिती मिळाली की, लातूर पोलीस गणेश उत्सवाच्या व विसर्जनाच्या बंदोबस्तात व्यस्त असणार याचा अभ्यास करून व तशी संधी साधून काही दरोडेखोर लातूर ते मुरुड जाणारे रोडवर दरोडा टाकण्याच्या तयारीने साहित्य महाराष्ट्र ग्रामीण बँक ते किया शोरूम दरम्यान संशयितरित्या दोन मोटार सायकल वरून फिरत आहेत अशी माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी सदर माहितीची खातरजमा करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी तात्काळ सदरची माहिती वरिष्ठांना कळविली. त्यावरून पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक दिनांक २८/०९/२०२३ रोजी संध्याकाळी १७ ३० वाजण्याच्या सुमारास दरोडा टाकण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र ग्रामीण बँक ते किया शोरूमला जाणारे रोडच्या परिसरात बातमी प्रमाणे पाच इसम रोडच्या साईडला थांबलेले दिसले त्यांच्यावर सदर पथकाने छापा मारून ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा पाच पैकी दोन ताब्यात आले व तीन इसमाने त्यांच्या जवळील दोन बॅग जागेवरच टाकून च्या दिशेने पळून गेले त्यांचा पाठलाग केला परंतु ते मिळून आले नाहीत. दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना त्यांच्याकडे बॅगा व इतर साहित्यासह पथकामार्फत ताब्यात घेण्यात आले. त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव दरोडा घालण्याच्या तयारीत असलेले



इसम नामे विकासकुमार पिता श्रीगोपाल शरण गुप्ता, वय २७ वर्ष, राहणार पोस्ट तिउरी ठाणा, मानपुर जिल्हा नालंदा राज्य बिहार.(अटक), अमितकुमार रवींद्रसिंग यादव, वय २२ वर्ष राहणार फतवा तहसील, जिल्हा पटना राज्य बिहार.(अटक), शिवकुमार उर्फ संजीव कुमार यादव वय ३० वर्ष, राहणार हाजीपुरा जिल्हा वैशाली राज्य बिहार.(फरार), लकीकुमार राजकुमार प्रधान, वय २८ वर्ष, राहणार गांधी मार्केट, पश्चिम सारंगपूर ,पश्चिम बिहार, दिल्ली.(फरार), छोटू उर्फ ननकी यादव, वय १९ वर्ष, राहणार जामा मजीद जवळ,वैशाली जिल्हा, राज्य बिहार (फरार) असे असल्याचे सांगितले त्यांची व सोबतच्या आरोपींनी जागेवरच टाकून दिलेल्या दोन बॅगाची झडती घेतली असता त्यांच्याकडे चार पिस्टल, एक गावठीकट्टा, ५९ जिवंत काडतुस तसेच एक बारा ॲन्टीना असलेले मोबाईल नेटवर्क जैमर, एक मोबाईल नेटवर्क जामर चे रेंज फिक्पेन्सी डिटेक्टर ॲन्टीनासह, एक चार्जर, चार वेगवेगळ्या कंपनीचे सिमकार्ड सह मोबाईल, काळे रंगाचे कापडी मास्क ,रबरी हॅण्डग्लोज, लोखंडी रॉड, बासुसिंह नांवाचे बनावट आधार कार्ड, एक ड्रायव्हिंग लायसन, दोन मोटार सायकल चे कागदपत्र, मो. सा.क्र. चक-२८-इए-६७५३ चे आरसी बुक, प्रशांतकुमार नांवाने तयार केलेले एक बनावट आधार कार्ड , एक ड्रायव्हिंग लायसन ,एक ढतड कंपनीची काळे रंगाची ठढठ-१६० मोटार सायकल पासींग नंबर चक-२८-इए-६७५३ असा असलेली, लोखंडी/प्लॅस्टीकची मुठ असेलेले तीन चाकु व तीन कातरी, एक लोखंडी पक्कड, दोन खाकी रंगाचे चिकटपट्टी बंडल आणि एक कापडी मास्क असा एकूण ३५६२३०/-रुपयाचा मुद्देमाल एक मोबाईल ग्रामर एक मोटर सायकल असे साहित्य मिळून आले. त्यांना अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की,पटना येथील कारागृहातील गुन्हेगार सुबोधसिंग राहणार चंडी जिल्हा नालंदा राज्य बिहार याचे संपर्कात असून त्यांने,आम्ही दोघे व आमच्यासोबत असलेले व पळून गेलेले बिहार येथील तीन जणांनी कर्नाटक राज्यातील आळंदी येथे किंवा महाराष्ट्रातील लातूर येथील एखाद्या बँकेवर किंवा सराफ दुकानावर किंवा गोल्ड फायनान्स आस्थापनावर दरोडा टाकण्याचा कट रचला होता. व त्याप्रमाणे दरोडा टाकण्यासाठी पूर्ण तयारीनिशी सदर परिसरात थांबल्याचे कबूल केले.

त्यावरून नमूद आरोपी विरुद्ध पोलीस अमलदार खुर्रम काझी यांनी दिलेल्या फिर्याद वरून नमूद पाच आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७३०/२०२३ कलम ३९९,४०२, १२०(१),४२०,४६५,४६८, भादवी ३ (१) २५,७(अ)/२५ शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके हे करीत आहेत .

सदर गुन्ह्यातील आरोपी हे बिहार राज्यातील सराईत गुन्हेगार असून गणेशउत्सव व विसर्जनामध्ये पोलीस व्यस्त असणार याचा फायदा घेऊन लातूर मध्ये काहीतरी मोठा दरोड्याचा गुन्हा करण्याच्या पूर्ण तयारीसह चार पिस्टल, एक गावठी कट्टा व तब्बल ५९ जिवंत काढतुसह बनावट आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच दरोड्यासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य हॅन्डग्लोज, मास्क चिकटपट्टी, लोखंडी रॉड, कटर ,कात्रीसह मिळून आलेले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने अतिशय कार्य कुशलतेने दरोड्याची आधीच माहिती मिळवून दरोडेखोरांना गुन्हा करण्याच्या अगोदरच ताब्यात घेतली आहे. त्यामुळे बाहेर राज्यातील सराईत दरोडेखोरांना दरोड्याचा मोठा गुन्हा करण्यापासून रोखले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनात केलेल्या कार्यवाहीचा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कौतुक केले आहे.

तसेच नमूद गुन्हेगारांनी दरोडा टाकताना सदर परिसरातील मोबाईल नेटवर्क जाम होण्याकरिता मोबाईल जामर बाळगलेले असून पोलिसापर्यंत वेळेत माहिती पोहोचू नये, किंवा इतर लोकांचा आपसात संपर्क होऊ नये हा उद्देश असल्याचा दिसून येत आहे.

नमूद फरार आरोपींच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून शोध सुरू असून संबंधित गुन्हेगारांनी यादी कोठे कोठे गुन्हे केले आहेत या संदर्भात तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार पोलीस अंमलदार खुर्रम काझी, राहुल सोनकांबळे, यशपाल कांबळे, योगेश गायकवाड, संपत फड, मनोज खोसे, प्रदीप चोपणे,रामहरी भोसले यांनी केली आहे.

## अनुसचित जाती जमाती प्रतिबंधक कायदयासाठी बजेटची तरतुद करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल - ॲड विकास ढगे

लातूर :- अनुसचित जाती जमाती प्रतिबंधक कायदयासाठी बजेटची तरतुद करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल - ॲड विकास ढगे अनुसूचित जाती जमाती कायद्याअंतर्गत अनेक प्रकरणात सन २०२२ - २०२३ मध्ये महाराष्ट्र शासनाने आजतागायत बजेट मंजूर करून समाजकल्याण विभागास दिले नाहीत. सदर समाजकल्याण खात्याचे मंत्री स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असून त्यांच्याकडून कार्यालयीन कामकाजा बजेट देण्यासंदर्भात दलित मागासवर्गीय समाजावर अन्याय अत्याचार केला जात आहे. तसेच समाजकल्याण विभागास एक वर्षांपासून आजतागायत बजेट दिले नाहीत. त्यामुळे दलित समाजामध्ये



महाराष्ट्र राज्य सरकार विरोधात संतापाची भावना निर्माण होत आहे. सदर ट्रॉसिटी कायद्यासाठी तात्काळ मुख्यमंत्री तथा समाजकल्याण मंत्री यांनी बजेटची तरतुद करून सदर विभागास वर्ग करण्याचा आदेश दयावा अथवा दलित आंबेडकरी समाज रस्त्यावरून सरकारच्या विरोधात आंदोलन छेडल्याशिवाय राहणार नाही याच्या परिणामाची जबाबदारी प्रशासनाची राहील. तरी अनुसुचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यासाठी बजेटची तात्काळ तरतुद करून समाजकल्याण विभागास वर्ग करण्यासंदर्भात कार्यवाही करावी अथवा नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस लातूरच्या वतीने कायदेशीर मार्गाने तीव्र स्वरूपात आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ॲड विकास ढगे यांनी दिला आहे .

## तहसीलदार पद आता कंत्राटी पद्धतीने भरणार



मुंबई : राज्य शासनाने शासकीय पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतल्यानं राज्यातील नागरिक संताप व्यक्त करत आहेत. यापूर्वी सरळसेवा भरती कंत्राटी पद्धतीनं भरण्याची जाहीरात सरकारनं काढली होती. आता तहसीलदार पदासाठीही कंत्राटी भरती केली जाणार आहे. त्यामुळं राज्य सरकारनं होतकरु तरुणांना पुन्हा एकदा झटका दिला आहे.

जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयानं तहसीलदार पदाची जाहिरात काढली असून ही भरती कंत्राटीपद्धतीनं होणार आहे. या जाहिरातीनुसार, नायब तहसीलदार, कारकून पदं कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. सरकारच्या या निर्णयावर राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्रशासनात येण्याची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला आहे. तहसीलदारपदासारखी जागा जर कंत्राटी पद्धतीने भरली जाणार असेल तर आम्ही काय करायचं? असा सवाल एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी केला आहे.

## शाळा दत्तक योजना आणि नोक-यांचे कंत्राटीकरणाच्या विरोधात फकिरा ब्रिग्रेडची निदर्शने

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये लाखों नौक-यांचा अनुशेष शिल्लक असतांना ६ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने जी.आर. काढून राज्यातील सर्व शासकीय विभागातील सरकारी नोक-यांचे कंत्राटीकरण केले, तसेच महाराष्ट्रातील ६२ हजार सरकारी शाळा, श्रीमंत, भांडवलदार, व्यापारी, उद्योगपतींना दत्तक देण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ रोजी शासनादेश काढून महाराष्ट्रातील गरीब, वंचित,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवायचे आणि महसूल वाढवण्यासाठी दारूच्या दुकानांना मान्यता द्यायची , महाराष्ट्रातील विविध मंदिराना पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन २४०० कोटी रूपये मंजूर करून एस.सी.एस.टी.ओबीसी जातीतील विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्याचे षडयंत्र हे तीनपाई सरकार करीत आहे. याचा फकिरा ब्रिगेडच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.

सध्या केंद्रात आणि राज्यात मनुवादी विचारांचे सरकार सत्तेवर कार्यरत असून या सरकारने देशातील एस.सी.एस.टी.ओबीसी.समाजातील विद्यार्थी, सुशिक्षित तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे.केंद्र सरकारने कौशल्य विकासाच्या नावाखाली या देशातील बलुतेदारी पध्दत तसेच वर्णव्यवस्था,जातव्यवस्था कायम ठेवण्यासाठीच ही योजना सुरू केली आहे ,तर दुसरीकडे केंद्रात सचिव, उपसचिव, संचालक, उपसंचालक या सारख्या पदांवर सवर्ण समाजातील तरुणांची डायरेक्ट भरती केली जात आहे.या पदांना कंत्राटी पद्धत का लागू नाही असा प्रश्न समाजात उपस्थित केला जात आहे.या मनुवादी सरकारचा खरा चेहरा देशातील जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असून या राज्यात म.फुले यांनी इंग्रजाकडे सक्तीच्या शिक्षणाचा अग्रह धरला, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात १९०२ ला प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून १ते १४ वर्ष वयोगटातील मुलांमुलींना मोफत शिक्षणाची तरतूद केली;परंतु आज या सर्व विचार,धोरणाला मूठमाती देऊन राज्यकर्ते योजना राबवत असल्याचे सिद्ध झाले आहे.याचा निषेध करण्यासाठी दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी अकरा वाजता प्रा.राजेंद्र लोदगेकर, राज्य कार्याध्यक्ष, फकिरा ब्रिग्रेड,श्रीरंग सरवदे, प्रदेशाध्यक्ष, फकिरा ब्रिग्रेड,मा.नरसिंग घोडके, निमंत्रक,लसाकम,





मा.वैशाली पवार, प्रदेशाध्यक्ष, महिला आघाडी, श्रीमती उर्मिला नवगिरे, जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी,लातूर,श्रीमती नागिनी थोरात, पार्वती झुंजारे, उस्मानाबाद , संजय विरूळे, किशोर कसबे, सतीश शिंदे,,संतोष पटनुरे, पांडुरंग मस्के, गोविंद धबडगे,सुरेकांत कदम,बाळू पटनुरे, सुदर्शन शिंदे, मुकेश लोंढे, नाना लोंढे, विपूल तपघाले,अंगद कांबळे,आदी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली वरील सर्व जी.आर.रद्द करण्यात यावेत म्हणून निदर्शने करण्यात येणार आहेत तरी फकिरा ब्रिगेडच्या सर्व पदाधिकारी ,कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन सचिन शिंदे, जिल्हाध्यक्ष , लातूर यांनी केले आहे

## जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार आक्रमक



लातूर : मंजूर होऊनही गेल्या १० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न तात्काळ सोडविण्यात यावा यासह लातूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण करण्याचा शासन निर्णय रद्द करावा आणि सोयाबीन संशोधन केंद्र लातूरलाच झाले पाहिजे या प्रमुख मागण्यांसाठी माझं लातूर परिवाराच्या वतीने येत्या २ ऑक्टोबर २०२३ पासून शहरातील गांधी चौक येथे बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, मनपा आयुक्त आणि गांधी चौक पोलिस निरिक्षक यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आले आहे. तसेच या आंदोलनाची माहिती आणि निवेदन ईमेलद्वारे मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, कृषी मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, लातूर जिल्हा पालक मंत्री यांनाही पाठविण्यात आल्याची माहिती माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे. प्रमुख मागण्या मंजूर झालेल्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न त्वरित सोडवावा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण करण्याचा निर्णय रद्द करावा सोयाबीन संशोधन केंद्र लातूरला झालेच पाहिजे या मागण्या मान्य होईपर्यंत माझं लातूर परिवाराचे साखळी उपोषण सुरू राहील. लातूरच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व सजग नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनाला बळ द्यावे असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## विलासराव देशमुख युवा मंचतर्फे 'श्री'विसर्जन मिरवणुकांचे जंगी स्वागत

लातूर :- श्री गणरायाचे आगमन झाल्यापासून ते विसर्जनापर्यंत गणेश भक्तांनी गणेशोत्सव धार्मिक कार्यक्रमांसह विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा केला. दि. २८ सप्टेंबर रोजी 'श्री' चे विसर्जन झाले. 'श्री' चे विसर्जन मिरवणुक मार्गावर गंजगोलाई येथे श्री विलासराव देशमुख युवा मंचच्या वतीने स्वागत मंच उभारण्यात आले होते. या मंचाच्या वतीने प्रत्येक गणेश मंडळाच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली श्री विलासराव देशमुख विचारमंचच्यावतीनेगणेशभक्तांचेस्वागतकरण्यासाठीमंचउभारण्यात आला होता. प्रत्येक गणेश मंडळाच्या अध्यक्षाचा सत्कार करुन त्याचा श्री विलासराव देशमुख युवा मंचचे प्रशस्तीपत्र देण्यात आले.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे यांनी या स्वागत मंचास भेट देऊन श्री विलासराव देशमुख युवा मंचाच्या वतीने गणेश मंडळांच्या अध्यक्षांचा सत्कार केला. लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनीही विविध गणेश मंडळच्या अध्यक्षांचा सत्कार केला. गुलालाऐवजी फुलांची मोठ्या प्रमाणत उधळण करण्यात आला. यावेळी ॲड. समद पटेल, विजयकुमार साबदे, ॲड.दीपक सुळ, अशोक गोविंदपूरकर, सचिन बंडापल्ले, ॲड. देविदास बोरुळे-पाटील, आसिफ बागवान,विजय टाकेकर, प्रविण सूर्यवंशी, प्रविण कांबळे, कैलास कांबळे, रमेश सूर्यवंशी, महेश काळे, सुपर्ण जगताप, अकबर माडजे, अभिजीत इगे, बालाजी झिपरे, ॲड. अंगदराव गायकवाड, विष्णुदास धायगुडे, पंडित कावळे, रईस टाके, सुलेखा कारेपुरकर, शीतल मोरे, तनुजा कांबळे, युनूस शेख, तबरेजतांबोळी, युनूस मोमीन, करीम तांबोळी, बब्रुवान गायकवाड, जमालोद्दिन मणियार, आबु मणियार, सचिन कोरवाड, पिराजी साठे, अमोल गायकवाड, अभिषेक पतंगे, गिरीश ब्याळे, जय ढगे, युसूफ बाटलीवाले, ख्वॉजापशा शेख, एम. एच. शेख, राजू गवळी, किरण बनसोडे, संजय सुरवसे आदी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE